**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांक:01.12.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

1. **राष्ट्रीय सुरक्षिततेच्या मुद्यांवर सर्वोच्च पोलिस अधिकारी आणि सुरक्षितता संस्थाप्रमुखांसोबत पंतप्रधानांची चर्चा.**
2. **साप चावण्याच्या सर्व घटनांची नोंद करण्याची केंद्राची सर्व राज्यांना सूचना.**
3. **महाराष्ट्रात येत्या 5 डिसेंबरला सरकार स्थापन होणार.**
4. **राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४७ व्यां तुकडीचं दिमाखदार दीक्षान्त संचलन.**
5. **अमेरिकी डॉलरखेरीज अन्य कोणतंही चलन स्विकारु नका-डोनल्ड ट्रंप यांचा ब्रिक्स देशांना इशारा.**
6. **पुणे मॅराथनमध्ये 12 हजारांहून अधिक धावपटूंचा सहभाग.**
7. **बॅडमिंटनमध्ये भारताच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी.**

**आणि**

8. **फेंजल चक्रीवादळाचा तमिळनाडु आणि पुदुच्चेरीला तडाखा.**

**भुवनेश्वर-पोलिस परिषद**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उच्च पोलीस अधिकारी आणि विविध सुरक्षा संस्थांच्या प्रमुखांशी राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विविध मुद्द्यांवर काल ओडिशात भुवनेश्वर इथं चर्चा केली. अखिल भारतीय महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेत पंतप्रधानांनी पोलिसांना भेडसावणाऱ्या विविध कार्यान्वयन आणि पायाभूत सुविधांशी संबंधित समस्यांवरही चर्चा केली. नवे फौजदारी कायदे, दहशतवाद आणि नक्षलवादाला प्रतिबंध, किनारी सुरक्षितता, अमली पदार्थांची तस्करी, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ड्रोनसारख्या तंत्रज्ञानामुळं निर्माण होणारी आव्हानं यासह राष्ट्रीय सुरक्षिततेसंदर्भात महत्वपूर्ण बाबींवर या परिषदेत चर्चा होत आहे. 2 हजार 47 पर्यंत भारताला पूर्ण विकसित राष्ट्र आणि 2 हजार 27 पर्यंत देशाला जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थ व्यवस्था बनवण्याचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सुरक्षितता यंत्रणांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे असं मत अमित शाह यांनी या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना व्यक्त केलं. पोलिस सेवेतल्या उल्लेखनीय सेवेसाठीची राष्ट्रीय पदकंही या परिषदेत प्रदान केली जाणार आहेत.

**साप**

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना राज्य सार्वजनिक आरोग्य कायदा किंवा इतर लागू कायद्याच्या संबंधित तरतुदींनुसार सर्पदंशाची प्रकरणं आणि त्यामुळं होणारे मृत्यू 'सूचित करण्यायोग्य रोग' म्हणून गणण्यास सांगितलं आहे. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रधान सचिव आणि अतिरिक्त मुख्य आरोग्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात केंद्रीय आरोग्य सचिव पुण्य सलिला श्रीवास्तव यांनी सर्पदंश ही सार्वजनिक आरोग्याची महत्त्वपूर्ण चिंता असल्याचं सांगितलं. सूचित करण्यायोग्य रोग म्हणजे एक आजार, ज्याचं निदान झाल्यावर सार्वजनिक आरोग्य अधिकाऱ्यांना कळवणं आवश्यक असतं. साप चावण्याच्या समस्येवर उपाय म्हणून केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं सर्व संबंधितांशी चर्चा करुन 2030 पर्यंत एक आराखडा तयार केला आहे. देशभरात साप चावण्याच्या घटना आणि त्यामुळं होणारे मृत्यु यांची नोंद ठेवणं या आराखड्यासाठी अतिशय महत्वाचं आहे.

**शपथविधी**

महायुतीमध्ये कसलाही वाद नाही असं सांगत महाराष्ट्रात येत्या गुरुवारी 5 डिसेंबर ला शपथविधी होऊन सरकार स्थापन होईल असं उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अजित पवार यांनी म्हटलं आहे. राज्यात भाजपचा मुख्यमंत्री आणि शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उपमुख्यमंत्री बनतील असं त्यांनी काल स्पष्ट केलं. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत ५ डिसेंबरला मुंबईतल्या आझाद मैदानावर महायुती सरकारचा शपथविधी होणार अशी माहिती भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी समाजमाध्यमावरून दिली आहे.

**एनडीए**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४७ व्यां तुकडीचा दीक्षान्त संचलन सोहळा काल पुण्यात वायुदल प्रमुख एयर चिफ मार्शल अमर प्रीत सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत खेत्रपाल मैदानावर दिमाखात पार पडला. सैन्य दलाच्या कारकीर्दीत कठीण निर्णय घेण्याची वेळ तुमच्यावर येईल त्यावेळी तुम्ही तुमच्या विचारांशी एकनिष्ठ राहा म्हणजे सोप्या मार्गाचा अवलंब न करता आव्हानात्मक मार्गाचा स्वीकार कराल असा कानमंत्र त्यांनी छात्रांना याप्रसंगी दिला. एयर चिफ मार्शल अमरप्रित सिंग यांनी संचलनाचं निरीक्षण केलं. सिंग यांच्या हस्ते राष्ट्रपती सुवर्ण पदक अंकित चौधरी, रौप्य पदक युवराजसिंग चौहान, कास्य पदक जोधा थोंगजय मयो तर गोल्फ स्क्वाड्रनला चीफ ऑफ बॅनर प्रदान करून गौरवण्यात आलं. सुखोई विमानांनी याप्रसंगी आकाशातून भरारी घेतली. १४७ व्या तुकडीतील ३५७ छात्र सैन्य दलात दाखल झाले. यामध्ये १९ मित्र देशांच्या छात्रांचा समावेश होता.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात...**

**ट्रंप-ब्रिक्स-चलन**

अमेरिकेचे नव-निर्वाचित अध्यक्ष डोनल्ड ट्रंप यांनी ब्रिक्स सदस्य देशांनी नवं चलन तयार करु नये किंवा अमेरिकी डॉलरच्या ऐवजी अन्य चलनाचं समर्थन करु नये अशी मागणी केली असून अन्यथा या देशांवर 100 टक्के कर लागू करण्याचा इशारा दिला आहे. हे देश नवीन ब्रिक्स चलन तयार करणार नाहीत, तसंच अमेरिकी डॉलरच्या जागी अन्य कोणत्याही चलनाला पाठिंबा देणार नाहीत असं वचन या देशांनी दिलं पाहिजे अशी मागणी ट्रंप यांनी समाज माध्यमावरील एका संदेशाद्वारे केली आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये अमेरिकी डॉलरला ब्रिक्स देश पर्याय देण्याची कोणतीही शक्यता नाही आणि असा प्रयत्न कोणत्याही देशानं केला तर त्यांनी अमेरिकेला रामराम ठोकावा असा इशारा ट्रंप यांनी या संदेशात दिला आहे.

**भारतीय-विद्यार्थी**

अमेरिकेत नुकारापु साई तेजा या भारतीय विद्यार्थ्याचा खून झाल्याबद्दल परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी दुःख व्यक्त केलं आहे. या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना शिकागोमधील भारतीय दूतावासाद्वारे सर्व शक्यती मदत केली जात असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरील एका संदेशात म्हटलं आहे. या विद्यार्थ्याचा खून करणाऱ्या लोकांविरुद्ध तत्काळ कारवाई करण्याची मागणी शिकागोमधील भारतीय दूतावासानं केली आहे.

**बांग्लादेश-कायदा-सुव्यवस्था**

बांग्लादेशमधील हंगामी सरकार देशातील कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात अपयशी ठरल्याबद्दल तिथल्या प्रमुख व्यवसायिकांनी चिंता व्यक्त केली आहे. ढाका चेंबर ऑफ कॉमर्सद्वारे आयोजित

एका व्यवसाय परिषदेत बोलताना या प्रमुखांनी सांगितलं की बांग्लादेशातील अस्थिर परिस्थिती अशीच कायम राहिली तर अर्थव्यवस्था स्थिर राखणं अवघड होईल.

**विश्व एड्स दिवस**

ॲक्वायर्ड इम्युनो डिफिशियन्सी सिंड्रोम म्हणजेच एड्स या आजाराबाबत लोकांमध्ये जागरुकता वाढविण्याच्या उद्देशानं विश्व एड्स दिवस आज पाळण्यात येत आहे. हक्कांच्या मार्गांवर चला अशी यावर्षीच्या एड्स दिवसाची मध्यवर्ती संकल्पना आहे. एचआयवी विरुद्ध लढा देण्यासाठी एकत्र येणं आणि या रोगाने ग्रस्त लोकांना पाठिंबा व्यक्त करण्यासाठी लोकांना या दिवसानिमित्त एक संधी देखील मिळत असते. मध्य प्रदेशात इंदूर इथं विश्व एड्स दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमांचं उद्घाटन केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे पी नड्डा आज करणार आहेत. या वर्षीच्या एड्स दिनानिमित्त, जागरुकता वाढवणं, उपचारासाठी अधिकारांवर आधारित दृष्टिकोनाला चालना देणं, आणि एचआयवी/एड्स झालेल्यांविरुद्धचा भेदभाव नष्ट करणं यावर लक्ष केंद्रित केलं जाणार आहे. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटना म्हणजे नाको 1992 पासून दरवर्षी 1 डिसेंबर रोजी विश्व एड्स दिवस पाळत आहे. 2030 पर्यंत एचआयवी/एड्सचं निर्मूलन करण्याच्या जागतिक उद्दिष्टाच्या दिशेने आव्हानं आणि प्रगती यांच्यासाठी सहयोग बळकट करण्यासाठी यानिमित्त मदत होत आहे.

**नागालँड-राज्य**

नागालँड आपला बासष्ठावा स्थापना दिवस आज साजरा करत आहे. 1963 मध्ये या दिवशी नागालँड भारताचे सोळावे राज्य बनले. नागालँडच्या इतिहासातील या महत्वपूर्ण मैलाचा टप्पा साजरा करण्यासाठी राज्यभरात आज अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रम राजधानी कोहिमा इथं होणार आहे. मुख्यमंत्री नेईफिऊ रियो याप्रसंगी लोकांना संबोधित करतील आणि गेल्या साठ वर्षातील राज्याच्या वाटचालीचा आढावा घेतील. नागालँडचे राज्यपाल ल. गणेशन यांनी नागालँड राज्य स्थापना दिवसानिमित्त राज्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.अतिशय कष्टपूर्वक साध्य केलेली शांतता एक मौल्यवान भेटवस्तू म्हणून लोकांनी जपावी असं आवाहन राज्यपालांनी आपल्या संदेशातून केलं आहे. दरम्यान नागालँडच्या प्रसिद्ध हॉर्नबिल उत्सवालाही आजपासून सुरुवात होणार आहे. यंदाचा या उत्सवाचा 25 वा वर्धापनदिन असून दहा दिवस चालणाऱ्या या उत्सवात नागालँडच्या सर्व 17 जमातींचा संगम होत असतो.

**पुणे मॅरेथॉन**

३८व्या पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनला आज पहाटे ३ वाजल्यापासून सुरुवात झाली. प्रमुख शर्यतींच्या निकालाची प्रतीक्षा आहे. "शाश्वत पर्यावरणासाठी धावा, हे यंदाचं घोषवाक्य आहे. या स्पर्धेमध्ये १२ हजारहून अधिक धावपटूंनी भाग घेतला असून त्यात सुमारे ८० परदेशी स्पर्धक आहेत.

**बॅडमिंट**

सैद मोदी भारतीय आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत, भारताच्या लक्ष्य सेननं पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. अंतिम सामन्यात लक्ष सेनची लढत सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेहशी होईल. दरम्यान भारताच्या पी व्ही सिंधूनंही महिला एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. अन्य एका स्पर्धेत, ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद पुलेला या भारतीय जोडीनंही महिला दुहेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. तर मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो या भारतीय जोडीनं चीनच्या जोडीवर विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला.

**चक्री वादळ**

चक्री वादळ फेंजलने काल रात्री तामिळनाडू आणि पुद्दुचेरी किनारपट्टीवर कराईकल आणि महाबलीपुरम दरम्यान धडक दिली. ताशी 90 किलोमीटरपर्यंत वाऱ्यांसह तामिळनाडू आणि शेजारच्या पुद्दुचेरीमध्ये २० सेंटीमीटर्सपर्यंत पाऊस पडला. वीज अंगावर पडून काल तीन जणांचा मृत्यू झाला. पावसामुळं बस, रेल्वे आणि विमान सेवांसह सार्वजनिक वाहतुकीवर परिणाम झाला. ही वाहतूक आता हळूहळू पूर्वपदावर येत आहे. असुरक्षित भागातील लोकांना अधिकाऱ्यांनी सुरक्षित आश्रयस्थानांमध्ये हलवलं आहे. भारतीय हवामान विभागानं तामिळनाडू, दक्षिण आंध्र प्रदेश, केरळ आणि अंतर्गत कर्नाटकातील अनेक भागांमध्ये मुसळधार ते अत्यंत मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर लाल बावटा जारी केला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**